

# बारुदाची वात



ह.बा.कऱ्हाळे

# बारुदाची वात

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# बारुदाची वात

हनुमान बापूराव कऱ्हाळे

ई साहित्य प्रतिष्ठान

# बारुदाची वात (काव्यसंग्रह)

कवी
हनुमान बापूराव कऱ्हाळे
पत्ता:मु.पोस्ट.डिग्रस (कऱ्हाळे).

ता.जि.हिंगोली. ४३१५१३.

मो.नं.८६२३९५०९२६.

ब्लॉग :https://hanumankarhale

youtube : (https://www.youtube.com/ )

mail : hanumankarhale1996@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क कवीकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट, गीत किंवा इतर रुपांतर करण्यासाठी कवीची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

**e**sahity@gmail. com

**e**Sahity Pratishthan

**e**leventh floor

**e**ternity

**e**astern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

App : https://play.google.com/store/apps/details? id=com.esahity.

प्रकाशन : १४ एप्रिल २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य - प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे .

रसिकजनहो



माझा पहिला कवितासंग्रह आपल्या पदरात टाकताना अतिशय आनंद होतोय. ज्ञानेश्र्यांच्या ज्ञानेश्वरी पासून तुकारामांचे अभंग, बहिणाबाइंच्या ओव्या, फुल्यांचे अभंग इथपासून ती अलीकडची ढसाळांची कविता ह्यात आपण जगलो आहोत, ह्या अभंग, कवितात आपण स्वतःला पाहिलं आहे. मी पण पाहतो. मानवी संस्कृतीचा, मराठीचा हा डोलारा चढवायला अनेकांनी हातभार लावला त्यातला एक मी आहे ह्यापेक्षा आनंद तो दुसरा कोणता!.

माझ्या डिग्रस गावातील ओढ्याकाठी बसून मी अनेक कविता लिहिल्या , वयाच्या सोळाव्या वर्ष्यापासूनचा हा माझा अविरत प्रवास. सुचलं तिथं लिहून काढलं, त्या कवितेला पोटाशी धरलं, मायेनं कुरवाळलं, म्हनुन ती हि माझं दुःख मांडायला, सुख उधळायला तयार झाली. म्हनुन पहिले तर कवितेचेच आभार.

माणसाचं कुठंतरी, कुणासोबत तरी जुळत असतं. मग कधी हा जुळलेला धागा तुटतो, रक्ताळतो. मग त्या ठिकाणी आपण गाठ मारून त्याचं सांत्वन करतो. जग या गोष्टीला विसरत पण ज्याच्या जीवनात गाठ पडली आहे त्याची जखम भळभळते, तिथंच ठेचा लागतात अन मग याच भयाण आक्रोशात कविता जन्म घेते. हे माझ्या बाबतीत तरी झालेलं. आता माझी गाठ कुठे तुटली ते मी सांगणार नाही!.माझी कविता अशी स्फुरत गेली.

माझ्याच कवितेतील दोन ओळी

"नभी पेरल्या जलास मातीस अर्पितो मी
मातीत रोवुनी उभा नभास तोलतो मी "

हि उभं राहण्याची प्रक्रिया प्रत्येक कवितेच्या, कवीच्या बाबतीत होत असेल याच्यावर माझा विश्वास आहे. प्रत्येकाचं एक विश्व असतं. शब्द वेगळे पण कविता संवेदना सारख्याच ओकत असतात. ह्यात माझ्याही कविता कुठं फिट बसल्या तर आनंद, नाहीतर रसिक मायबापांनीं पाचर बसवून थोडं सांभाळून घ्यावं. माझ्या दीर्घ प्रवासात मला अनेक मानस भेटली. मी काहींना कवितेत उतरवलं ती माणसंही कवितेत अलगद बसली. माझी कविता म्हणजे त्या माणसांचाच जीवनप्रवास.

मी कविता करण्यात माझ्या आजींचा आणि आईचा सिंहाचा वाटा, त्यांच्या शिवाय हा नर लिहिता झाला नसता. घरी जात्यावर ओव्या ऐकायला मिळायच्या, शेतात आईच्या मधुर आवाजात गाणी ऐकायला मिळायची. ह्या वातावरणातच माझी लेखणी फुलली. सुरवातीला शब्द मिळणे फार अवघड. मग इयत्ता पहिली ते दहावीच्या कवितेतून शब्द उसनवारीत आणले जायचे म्हणजे संपूर्ण नाही तर थोडेथोडकेच. पुढे मन पाजळायला लागलं आणि कुण्या तरी अकस्मात माझ्या आयुष्यात आलेल्या व्यक्ती साठी कविता लिहिण्याचा हा खटाटोप सुरु झाला ,आणि आश्चर्य म्हणजे कविता फुलायला लागली. मला हवी तशी. म्हणून त्यांचे हि आभार. माझी कविता कशी आहे? हे रसिकजणच सांगतील , कारण लिहिणाऱ्यापेक्षा वाचणारा मोठा. त्या कवितेचा योग्य मतितार्थ काढणारा श्रेष्ठ. पण मग ते ज्याच्या त्याच्या अनुभवावर अवलंबून. कविता कशी आहे ती वेगवेगळया लोकांसाठी वेगवेगळी आहे. ती दुःखात बुडालेल्याना हातभार लावते, सुखात नाचणाऱ्यांची सोबती होते, विरहात तळमळणाऱ्यांची साथीदार होते. कवितेची अनेक रूपं. त्यातलं आपलं कोनात हे आपणच बघावं.

हजारो वर्ष्यांच्या मानवी इतिहासातला, कवितेच्या विश्वातला मी एक पामर कवी. मी जेष्ठ श्रेष्ठांच्या ओळीतला नाही, माझी कविता कशी हे रसिक जणंच सांगतील. पण माझ्यासाठी हा माझ्या हृदयातला हुंकार आहे , माझ्या जाणिवांचा

अविष्कार आहे. त्यामुळे माझ्या कविता माझ्यासाठी तरी श्रेष्ठ आहेतच, कारण मी स्वतःला माझ्या कवितेत बघतो.

ह्या अविरत प्रवासात माझे गुरु रामकिसन कऱ्हाळे सर, यांचा मी ऋणीच राहणे पसंत करेल. माझे आजोबा श्री नानाराव कऱ्हाळे, वडील श्री बापुराव कऱ्हाळे यांच्या चरणी माझ्या या कविता अर्पण. माझ्या सर्व कविता एका दमात वाचणारे माझे शिक्षक श्री गोविंदराव गुरुजी, जगन गुरुजी यांचे हि आभार. संग्रहासाठी आशयपूर्ण मुखपृष्ठ चितारणारे माझे मित्र ऋषिकेश टोम्पे,या कविता संग्रहासाठी प्रस्तावना लिहिणारे आणि कविता लिहिण्यासाठी मला सतत प्रोत्साहित करणारे कवी. प्रा. शिवाजी कऱ्हाळे सर यांच्यासाठी माझ्याकडे कृतज्ञतेचे शब्द नाहीत. ई-साहित्याने नवोदित कवींसाठी तयार केलेला हा कट्टा खरंच कौतुक करण्यासारखा आहे. माझ्या सारख्या नवोदित कवींसाठी अश्या आपल्या वाटणाऱ्या स्थळाची गरज होतीच. मी ई-साहित्याच्या ऋणातच राहणे पसंत करेल. तसेच आजवर माझ्या कवितांचे कौतुक करून माझ्या लिखाणाला प्रोसाहन देणारे माझे स्नेही, मित्रपरिवार व रसिकांचे मनःपूर्वक आभार मानून हा संग्रह आपणापुढे ठेवतो

धन्यवाद !.

-हनुमान कऱ्हाळे.

# प्रस्तावना

कवी.डॉ.श्रीराम कऱ्हाळे

"बारुदाची  वात " हा , कवी.  हनुमान बापूराव कऱ्हाळे यांचा पहिला कवितासंग्रह .  या कवितासंग्रहानेच काव्यक्षेत्रात पदार्पण. ग्रामीन  जीवनात आणि कृषिसंस्कृतीत जन्म झाल्याने कृषीची सर्व कामे करावी लागणे हे अपरिहार्य आहे.  शेतातील पेरणी कापणीची , गायी , बैल , म्हशी या सर्व कामाशी एकरूपता आलेली. शेतातील कामाविषयी असलेल्या भावना , शेतात कष्ट करणारा शेतकरी याना भरपूर कष्ट उपसूनही त्या परिश्रमाचे  योग्य फळ मिळत नाही . सभोवतालच्या परिस्थितीचा मागोवा घेऊन कवी हा काव्यलेखन करत असतो . समाजातील चालीरीती प्रथा परंपरा ह्या अतिशय जवळून बघण्याचे काम कवी करीत असतो. त्यांच्या  मनात निर्माण झालेल्या असंख्य प्रश्नांची उत्तरे  कवितेच्या माध्यमातून कवी करत असतो.

आई वडिलांसाठी मुले हि काळजाचे धड असतात त्यांना घडवण्यासाठी जीवाचे रान करत असतात. आपले जीवन आपले भविष्य म्हणजे मुले आहेत त्यांना लागणाऱ्या सर्व सोइसवलती आपण कष्टात राहून पुरवत असतात. त्यामागे त्यांचा उद्देशही असतो.

"पायातले काटे खुडत
पदराचा काठ सावरत
खुरपं जन्माचं सोबती करून
नांदणारी आई म्हणायची
शिक पोरा ..!”

शब्दाची ओळख नसणारी आई मुलाने भरपूर शिकून मोठ्ठ व्हावं असा आशावाद वक्त करताना दिसते .

ग्रामीण जीवन हे कृषिसंस्कृती संपन्न आहे. खेड्यातील ऐंशी टक्के लोक शेती व्यवसायाशी निगडित आहेत. शेती पिकली तर सर्वांचे जीवन उज्वल होते. नाहीतर सर्वाना जीवन दुःखात काढावे लागते.

ग्रामीण जीवनातील सतत ओला तर कधी कोरडा दुष्काळ पडत असतो. त्या दुष्काळाच्या झळात होरपळत येथील जनमानसे जीवनाची वाटचाल करत असतात. आपल्या मुलाबाळांचे भवितव्य उज्वल व्हावे. हि आशा ठेवून अहोरात्र परिश्रम करून मुलाबाळांना शिक्षण देताना दिसतात. हि सर्व माणसे एकमेकांच्या दुःखात एकरूप होतात.तेंव्हा कवी म्हणतो

"माझी नखशिखान्त काळजी घेणाऱ्या
माणसांची जत्राच होती गावी
जी नेहमी मी मोठा होण्यासाठी विचारायची
मुलं कधी लागायचाय तुझा निर्णय !"

ग्रामीण भागातील असलेली शाळा तीच सुंदरपण कवी रेखाटतो.

"शिक्षक बाई चांगल्या
स्वर त्यांचा जशी कोकीळा
गुरुजी सांगतात गोष्टी
शाळेत असते मजाच मज्या. "

याच शाळेतील होणारी खिचडी , राष्ट्रगीत गायनासाठी विध्यार्थ्यांच्या रांगा , शाळेतील विविध खेळ यांचे दर्शनही कवितेतून होते.

लग्नानंतर मुलगी सासरी जाते. सासरी गेल्यानंतर माहेरचे संस्कार तिने जोपासले पाहिजे , याचे चित्रण कवी करतो.

"पोरी मानस आपली त्यांना गोड बोलायचं
चुकलं , मुकल घरदार नमत घ्यायचं
तुह्या वागण्याचा पोरी आम्हा भरवसा हाय
सासू आईच दुसरी सासरा बाप असतोय."

कवी ऋतुपाठी या कवितेत ऋतूच वर्णन करताना म्हणतो ,

"उन्हाळी धुरडा उडावा
वावटळ सुटावी
सर्वस्व जावं उडून
सामावलेलं कमावलेलं"

"उत्तरार्ध " या कवितेतून निसर्ग आणि माणसाचे एकरूप जाणवताना दिसते. कापसाच्या झाडाची लागवड केल्यानंतर जोमदार लुसलुशीत कोंब येतो. काही दिवसातच पाने फळे फुले यांनी झाड बहरून जात. बहरलेल्या झाडावर प्रेम करणारी माणसे असंख्य असतात त्यांचे कौतुक करणारे असंख्य असतात. तसे तरुणपणी काम करणाऱ्या माणसांचे असते. कुटुंबात समाजात त्याला खूप मानसन्मान प्राप्त झालेला असतो. तारुण्याचे वैभव संपल्यानंतर कुणीच त्याला विचारात नसतो. ती मानस काचण्या सारखी होतात. इतरांना नकोनकोशी वाटतात. तरीपण जगावं लागत. हि खंत कवी पुढील शब्दात व्यक्त करतो.

"आता म्हातारलोय मी
अजूनही बळ आहे मुळात
मात्र अंगात उरल्यात
फक्त जीवघेण्या काचण्या"

"स्वप्न " या कवितेतून शेतात पेरणी झाल्यानंतर हाती उत्पन्न येईल आणि या उत्पनातून काय काय करता येईल.

"जरि लुगड्याले तुह्या
घालू नवा आता साज
बाच्या पायाले आनाच
नव एक पायताण "

ग्रामीण जीवनात वाटणी फार महत्वाची असते ती शेताची , घराची , सोन्या- नाण्याची , आईवडिलांची , कर्जाची असते. या वाटणीत शांत स्वभावाची मानसे हरतात अनंत धूर्त स्वभावाची माणसे जिंकतात. म्हातारे झालेले आईवडील शेवटी एकटेच राहतात. गावातील माणसेही फक्त हळहळ व्यक्त करतात.

"आता मी  उरलोय एकटाच
भवसागरातील काही मानस
टकमक टकमक बघत असतात
माझ्या पासून धडा घेण्यासाठी उत्सुक"

"रीत" या कवितेतून कवी आपले मत मांडतो

"हवे नव्हे ते भोगून द्यावे
संसाराची रीत हि
रिकाम्या हातात दुसरे
उरत नाही गीत हि."

'क्रांती ' , 'गावकुशीच्या दिवट्या ' , 'तुफानी विचार ' या कवितांतून येणारे विचार हि नव्या उद्याच्या क्रांतीसाठी सामर्थ्यशाली आहेत.

साहित्यक्षेत्रात त्यांची कविता प्रभावी ठरेल यात शंकाच नाही. त्यांच्या पुढील काव्यप्रवाहास माझ्या हार्दिक शुभेच्या..!

**-कवी. प्रा. डॉ. श्रीराम कऱ्हाळे.**
**मराठी विभाग प्रमुख**
**शिवाजी महाविद्यालय , हिंगोली.**

# अर्पणपत्रिका

जात्यावरच गाणं ज्यांनी
माझ्या कवितेत नकळत गुंतवलं
ती आमची आजी
सौ.गीताबाई नानाराव कऱ्हाळे
आणि
आमच्या आई
सौ.तुळसाबाई बापूराव कऱ्हाळे
यांना आदरपूर्वक अर्पण
व
आमचे वडील
श्री. बापुराव नानाराव कऱ्हाळे
यांच्या चरणी अर्पण.

# बारुदाची वात

ह.बा.कऱ्हाळे

# बारुदाची वात

हनुमान कऱ्हाळे

नभी पेरल्या जलास मातीस अर्पितो मी
मातीत रोवूनी उभा नभास तोलतो मी.

कवी. हनुमान कऱ्हाळे

# निर्णय.

पाचवीला पुजलेला दुष्काळ
पाठीवर वाहत वडील
घामाच्या पैश्याने वर आलो
मी शाळेत जाईपर्यंत.

मोठा झालो तसा वरचा वर्ग
शाळा बदलल्या,ट्युशन आले
महाविद्यालय आले.

पायातले काटे खुडत
पदराचा काठ सावरत
खुरपण जन्माचं सोबती करून
नांदणारी आई म्हणायची
शिक पोरा.

डोळे भरून यायचे तिचे
सावळा बुटका देह
झिजवत रानावना खपायची
मातीत आल्यापासून मातीसाठी.

तसे दिवस सरत गेले

हाताचे बळ संपत आले

वडिलांनी कळवलं,पोरा कुठवर शिक्षण?.

आवाजातही थोडा कमीपणा होता.

माझी नखशिकांत काळजी घेणाऱ्या

माणसांची जत्राच होती गावी

जी नेहमी मी मोठा होण्यासाठी विचारायची

मुला कधी लागायचाय तुझा निर्णय.



# विद्यार्थी होऊया.

पाटी-पाटी लिहिण्याची
दाटी वाटी ओळींची
सुट्टी मधली शाळेची
खिचडी पोहे खाण्याची.

रांगेत असे उभे रहा
राष्ट्रगीताचे सूर पहा
प्रतिज्ञा गायन करताना
पालन संविधानाचे करा.

भटकळ उगेच भटकू नका
गचाळ शिवी देऊ नका
शिक्षण आपुले आद्य दैवत
चरणी त्याच्या राहूया.

शिक्षकबाई खूप चांगल्या
स्वर त्यांचा जशी कोकिळा
गुरुजी सांगतात गोष्टी
शाळेत असते मजाच मज्जा.

सर्व खेळ खेळून आपण
आरोग्य आपले राखुया
नीतिमत्ता अन् स्वच्छता
आपली ओळख बनवूया.

चला मुलांनो चला आपण

विद्यार्थी होऊया

ज्ञानार्जन करुनी सारे

राष्ट्र सुखी  करूया.

२७/१२/२०१५.



# लगीनघाई

बाई बिगी बिगी करा कापूस येचनी
मह्या बाळिले आणाची नाकाची नथनी
चला पारुबाई बिगी झाला दम
झाडाच्या सावलीची बघा कलली कमान.

एकुलती लेक न तीच शिकणं सरल
येईल तिचा घोडोबा घोड्याव बसून
जाईन बा मही बाई टच डोळियाल पाणी
आभाळाची असे लेक तिचा दुसराच धनी

## बारुदाची वात

आई आणायचं मले बघ एक सोनकडं
टिकली, मेहंदीन डब्यातलं मेकप सामान
तुजी लुगडी नेसून पार कंटाळले बाई
सहावारी आणायची नवी आणायची चोळी

हो गं सुगरण मोठी दिलदार तुव्हा बाप
घर कर्जात ठेऊन मोज तुव्ह मोजमाप
परी जाशील पोरी लेऊन साज शृंगार
तुझ्या आईच घर बघ एकटं भासलं.

का व पारुबाई बोलत जा आई, बाबा
तुम्ही नवा एकटेन हाय कि वैदू काका
मी न एकटीच तिथं कोण? घर कोण दार?
कोण बुवा? कोण सासू? कोण सासरा न दीर?

हनुमान कऱ्हाळे

पोरी मानस आपली त्यांना गोड बोलायचं

चुकलं, मुकल घरदार नमत घ्यायचं

तुह्या वागण्याचा पोरी आम्हां भरवसा हाय

सासू ,आईच दुसरी, सासरा बाप असतोय.

करशील कन्यादान ओटी भरून देशील

कोण लावील मेंदी मह्या सख्या भावंडाल?

कोण बोललं बाबाले? तांब्या देईल भरून?

कोण आडावरी जाऊन आणेल घागरी भरून?


आस म्हणू नको पोरी मी हाय न व इथं

बाप तुव्हा दणकट ,भाऊ जीवाचं भावाचं

तूच चाललीस सखे पण सोडून सासरी

मी हाय न व लक्ष्मी इथं तशी तू दुसऱ्याची झाली.

२४-३-१७.



# खेळ.

रात्रीचा चांदणी उजेड
खेळात दिवसाच्या येत नाही
मृगजळाच्या भोवताली
ओलं कधीही फुटत नाही.

जीवाचे फुफाटे होऊन
रक्ताने युद्ध जिंकतात
सैनिकांच्या पदरात मात्र
सुख तिळमात्र पडत नाही.

काजव्यांचे जगणे मरणे
दिवसा सर्वांस अमान्य
रात्रीचे खेळ खेळूनही
स्तुती त्याची होत नाही.

पोकळीत या बेमालूम
तिर तीरावर झेलतो
माणसाच्या जगण्याचा
खेळ कधीच सरत नाही.

फुलांचे,कळयांचे द्वंद
फुलपाखराशीच नेहमी
जुना असूनही शत्रू
पेच काही सुटत नाही.

खेळ क्षणमात्र आयुष्याचा

जगणे असह्य करतो

पळून ससा ,थांबून कासव

खेळ कोणालाच सोडत नाही.

०४/०३/२०१६.



# ऋतूपाठी.

पावसाळ्याची ओली जमीन
चिखलामुळं अवघड
तसे जड जीवनात
चारित्राचे गड.

थंडीत हिवाळी पोरक्या
पक्क व्हावं नातं
जिरायत जमिनीत कोंब
उठून दिसावा.


उन्हाळी धुरळा उडावा

वावटळ सुटावी

सर्वस्व जाव उडून

सामावलेलं कमावलेलं.

०३/०७/२०१६.



# तुझ्याच झलकेमध्ये

खवळल्या सागरास विचार माझी प्रीत
माझ्याच गीतामध्ये  स्वच्छंदि न्हाऊन जा
तिमिराच्या सामोरी असेल कुठे तो चंद्र
शीतल चांदण्यास त्या तुझे रूप देऊन जा

हर्षभरले हृदयय माझे काळाकुट्ट रात्री
तुझ्या प्रीतीचा एकदा  पान्हा पाजून जा
मीट डोळे घे हृदयाशी कवटाळून मजला
भरल्या एकाकीपणात सर्वस्व माझी होऊन जा

बघ सोडतात सावल्या उजेडी माणसांची साथ
बघा करतात आपलेच रन आपुला घात
भरल्या घरास माझ्या छळन्या आधी वादळ
माझ्या सवे प्रीतीला हृदयात कोरून जा

संपतील ध्येय सारे वाट जातील जळून
पोळण्या आधी प्रीत गीत नवे देऊन जा
सणक उठेल काळजात मृत होईल काय सारी
नभांगण पेटण्याआधी हृदयात मज सामावून जा

उरेल मागे कळिकाळाची फिकट दीर्घ रेघ
दर्पणात मजसाठी थोडी हसुन जा
बघ कलंदर चालला सोडून किनारे
तुझ्याच झलकेमध्ये पाठमोरी लाजून जा

हनुमान कऱ्हाळे

# उत्तरार्ध

मी होतो
कापसातली एक बी
कोंबावलो
हात जोडूनच.

एक गोंडस फुल
एक पिवळं लाल
एक हिरवं पानही
एक हिरवं फळ.

फळ त्याच काय झालं ?

त्यातून उमटले हजारो जन्म
मी रुवात ठेवलं त्यांना
अगदी पांढऱ्याशुभ्र.

आता म्हातारलोय मी
अजूनही बळ आहे मुळात
मात्र अंगावर उरल्यात
फक्त जिवघेण्या काचण्या.

# काहिवेळा

काहिवेळा पाऊस पडतो
मातीच घर वाहून जात

काहिवेळा दुष्काळ पडतो
सिमेंटच घर होरपळून जात

काहिवेळा थंडी येते
कुडणाला बोथट करते

काहिवेळा माणुसकी संपते
घराचे नक्षे चोरून नेते

# डॉ .नरेंद्र दाभोलकर

अंधारात उजेड पेरण

उघड्यावर बिया कोंबावन

जमून गेलं तुम्हाला

अंधश्रद्धेची मुरेल पाळंमुळं

दगडाच्या मूर्ती

माणसातल्या धूर्त जाती

उघड्यावर पडल्या तुमच्यामुळे

मारणारांनी गोळ्या झाडल्या तुमच्यावर

एका झाडाचं मूळ उपटल.

पण ,

त्यांच्या ध्यानातच आलं नाही

अशी कित्येक बीज

तुम्ही कोंबवून ठेवलीत

मनामनात

नव्या क्रांतीसाठी .



# क्रांती.

मनाचिये चित्ती विचार क्रांतीचा
गोमट्या प्रीतीचा सलग मार्ग॥

देऊळाते देव उपाश्याचा खेळ
मनी मनोबल हृदयात विसावतो॥

दैवाचे पारडे त्यात दुःखाचाच भर
क्रांतीचा विचार सुखात भारलेला॥

ब्राम्हु केले खेळे पाण्यात डुंबवण्याचे
आता करावा विचार कोण आहे पामराते॥

## बारुदाची वात

सख्याचेही-सख्य त्यात सुरुंग लावला
तुक्याचेही बोला डुंबविले पाण्याते॥

देवचाखू केला त्याले दुधाचा गरोडा
तोडोनीया हृदया वेगळाले केले॥

लाथाडली माय माती म्हणे दगडाते देव
मारून त्यावर माथा आता भनकलं डोकं॥

निवद त्याले दिला म्हणे तो आता रुसला
माणसात जातीपण नाही भाकरीचा तुकडा॥

आम्ही पाटलाते मेलो सर्व सत्य त्यांचे हाती
तुफान उठलंय आता होउदे खरीखुरी क्रांती॥

हनुमान कऱ्हाळे

# मुकाट काठी.

दात्याला दातखिळी बसते
लुटारू लुटतात मळे
सभ्य संकोचतात नेहमी
असभ्याचे कीर्तन सोहळे .

सांष्टांगाशी वर्तन खोटे
दुष्ट गुंडास मोकळे रान
हत्ये पुरता दुरावा राखून
एकमेकांवर जळतो प्राण.

बारुदाची वात

एकाकी या उनाड जिवणी
उशीत साप वेटोळे घेती
मनबुद्धीच्या तर्काआधी
रक्ताची लख्तरे सजती.

श्वास निसर्गास आडवा
मनूचे मजले सजते
वृक्ष्यांच्या सालीसाठी
आज इथचे युद्ध पेटते

भाव मनीचा सहज चळावा
अंधाराला पाय फुटती
अपेक्षेची गणना दिवसा
बारुदाच्या वाती पेटती.


हनुमान कऱ्हाळे

भंपक झाले जीवन मरण

वैराग्याच्या शपथा घेती

जरी जळतो प्राण तव्यावर

हातामधली मुकाट काठी.



१५/१०/२०१६.

हनुमान कऱ्हाळे

# संभोग.

कामांध अग्निपरीक्षेच्या काळातील
मी रिचवतो माझ्यावर केलेले प्रयोग
कामवासनेच्या अतृप्त जगातआठवतात
मी माझ्यावरच केलेले बलात्कार.

उत्तेजित मेंदूच्या ठावठिकाण्यातुन
मी घेतो परस्पर माझी आज्ञा
अतिउच्च पाकळयांना फुलवणाऱ्या
साधनाला मीच होतो मग साधक.

## बारुदाची वात

सृष्टीच्या विनयशील संभोगाचे
मी रक्तारक्तात पेरतो दुर्गुण
उफाळून येणाऱ्या दर्यासाठी
लागत नाही तिची गरज केव्हांच.

छंद असल्यासारखे मी जपत राहतो
असंबध कराचे कामुकतेवर बळ
कामदेवतेची आठवत मूर्ती संभोगाची
कित्तेक रात्री मदमत्त झालो स्वतःतच.

त्या भयाण रात्रीचे पडदे सजवत
मी मानतो स्वतःला शीलवान,मात्र
बुब्बुळाच्या आतली कामुकतेची नजर
कुठेच थांबत नाही कोणत्याच वळणावर.

हनुमान कऱ्हाळे

# स्वप्न

धान पेरलं पेरलं
आता येईल बा सुगी
पाटी दप्तर घ्यायले
आता धावा बा बिगी.

तुह्या रानात हिरवं
नवी पालवी फुटलं
मह्या जीवनात त्याचा
बघ प्रकाश पडलं.

## बारुदाची वात

फासी घेऊ नग आता
तुह्या सुती कापसाले
लवकर बिगी बिगी
होईल बा बर सारे.

कर दिवाळी तयारी
गोड धोड खायचंय
माझ्या रुपेरी धडाले
नवं कापड शिवाचे.

आई पूस तुहे डोळे
माहेरची धर वाट
मह्या मामाले झाले मन
खळीभर पोत खूप.

हनुमान कऱ्हाळे

आता उजाडलं सार

दिस बहरून आला

तुह्या संसाराले सांग

नवा दिवस गावला.

मही लाडकी बहीण

तीच होईल लगीन

नवं घर दार बांधु

विनू संसाराची वीण.

जरी लुगड्याले तुह्या
घालू नवा आता साज
बाच्या पायाले आणाच
नवं एक पायताण.

ह्ऱ्या मुऱ्याले घालाची
मले घुंगराची माळ
नंदीगाईच्या पिलाले
एक कासरा नवीन

आवरगा बिगी बिगी
गाव जागलंया सार
मह्या शाळेले उगाच
व्हईल उशीर.

असं म्हणून लेकरू
धसलया कुशींमधी
मीट पाखरातू डोळे
नगं अंधाराची धुंदी.

असा पाऊस खट्याळ
स्वप्न दाखवून जातो
मह्या लेकराच्या दिशा
पार पुसून टाकतो.

१५/०५/२०१६.



# वाटणी.

केसांचं  गढूळपण  पांगताना
सुरुकुतल्या चेहऱ्याने हसताना
मी तमाम जिंदगीत जमवलं
ते वाटण्याची वेळ आली.

पोटचीमटा काढून घेतलेले रान
मधल्या मुलाने घेतले
पण ,माती कशी राखायची
हे माहीतच नाही त्याला.

साठीत बांधलेलं घर
मोठ्याला मिळाले खरे
घरात माणूसपण जपण्याचं
बळ नाही त्याच्या मुठीत.

मातीशी बेईमानी करून
मिळवलेलं सर्व  ज्ञात  अज्ञात
वाटणी करून घेतले पोटच्या गोळयांनी
शेवटचा राहिला धाकटा.

दुष्काळात होरपळत असताना गाव
मी दुराचाराने मिळवलेले क्षण
वाढीसाठी कसे पोषक ठरतील त्याच्याही
उरलेला वाटा घेऊन तोही पाठमोरा झाला.

आता मी उरलोय एकटाच

भवसागरातली काही मानस

टकमक टकमक बघत असतात

माझ्यापासून धडा घेण्यास नेहमी उत्सुक.

०१/१२/२०१५.



# छकुली

वहिनींची छकुली कशी
छान छान छान
खेळण्यातली बाहुली जशी
गोरी गोरी पान.

मऊ मऊ केस तिचे
हरिणीवाणी डोळे
पाहते कशी टकमक टकमक
जसे खारीचे नखरे.

हसते कशी गोड गोड
बोलते किती छान
इतक्या चांगल्या छकुलीच
काय ठेवावं नाव.

आणावी एक बाहुली कि
छान एक कार
हत्तीवर कि घोड्यावर
कशावर करावे स्वार.

छकुली संगे बाहुली
किती छान हसते
दोघींच्या रांगण्याने
सारे घर फुलते.


# रीत.

दिव्या मागून दिवे जळतात
प्रकाश तिळमात्र थांबत नाही
वणव्याच्या ज्वाळेनेही
जळायचं ते जळत नाही.

कोलतीच्या उजेडात
भाकरी काळ्या रापल्या जातात
माग मात्र कोळस्याशिवाय
खरंच काही उरत नाही.

आयुष्याचे झाड वाळके
सावली ना आधार देते
माणुसकीच्या फळालाही
बघ नासण्याची उपमा येते.

हवे नव्हे ते भोगून द्यावे
संसाराची रीत हि
रिकाम्या हातात दुसरे
उरत नाही गीत हि.



# ती.

तिच्या चेहऱ्याकडे

न्याहाळत मी विचारलं

हा पांढरा डाग कशाचा दिसतोय .

अनिश्चीततेनं तिन पाहिलं

आणि  डोकावली आरशात

उलटप्रश्नी  म्हणाली

कुठं काय आहे ?.

चेहऱ्यावरचा तो चंद्र डाग

कसा दिसेल आरश्यात

हलक्या आवाजात मी म्हटलं.

लाजून स्वतःतच ती म्हणाली
शेवटी चंद्रालाही डागच म्हणालास.

चर्रकन झालं माझ्या काळजात
शेवटी शब्दांनीही कापतात गळे,
सखे चुकलो.

अशा मार्मिक शब्दानेही
सुखावली नाही
तिच्याआतली  ती.

१८/०९/२०१६.

# प्रणयावेळी.

मम् चंद्रास वाटे हेवा
तुझ्या गालिच्या तिळीचा
मज सांग खरे सखे
हा अविष्कार कुणाचा.

काळयाकभिन्न बटीमधुनी
फेसाळलेला गोरा सागर
त्यावर बिंदी अमोघ चंद्री
विसावतो तो अदभूत राजन.

तुझ्या स्वराची लकेर हाळी
छातीवरची आर्त आद्रता

गंभीर होते प्रणयावेळी

तुझ्या हृदयीची मुकी वाच्यता.

अबोल झाली रात काजवी

प्रणयास्तव मी आतुर होतो

फुलल्या उखाण्यात रात्रीच्या

दिवसाचा मी मजूर होतो.

गुंतता पाकळीत दव

श्वासासाठी उसंत नाही

तरीही मी कुबेर आहे

तुझ्या नशेची हि जादू हळवी .

०८/१२/२०१६.

# गावकुशिच्या दिवट्या.

आता तुफान घोंगावू लागलं
मेणबत्या पेटायला लागल्या
गावकुशीच्या दिवट्या
आता चेतायला लागल्या.

कुठं दिस सुरु झालाय
भावना ओकायला लागल्या
संगतीच्या परिणामाच्या
फ़ैरी झडायला लागल्या.

## बारुदाची वात

मावळतीच्या आशा
द्वंद्व कराया लागल्या
चहू दिश्यांच्या पाखरांना
दिशा फ़ुटाया  लागल्या.

पालवी झाडाच्या चेतना
आकाशा छेदु लागल्या
ज्वालांच्या प्रचंड झोतात
प्रकाश वाटा फुलू लागल्या.

पुन्हा इतिहास घडतोय
वेळा पाने चाळू लागल्या
लढता लढता आकाशाशी
जमिनीशी वळू लागल्या.

हनुमान कऱ्हाळे


आता होणार नवी पहाट

जिभी साऱ्या बोलू लागल्या

वाऱ्यासवे प्राणातुनी

गाऊ लागल्या,उगवू लागल्या.

२९/१०/२०१६



# अग्निपंख

पंख होते सर्वांनाच
उडण्याची उमेद नव्हती
छातीत या धडाच्या
कल्पनेची साथ नव्हती.

एक तारा उजाडला
घेऊनि अग्निपंख
विश्वाचे उलगडण्या
गुपित खरे स्वल्प.

तुमच्यात साठले होते
प्रचंड ऊर्जास्रोत
नसानसात गात होते
अभ्यासाचे मित.

कल्पनेच्या परिघरेशा
टाकल्या पुसून तुम्हीं
माणसामाणसात जागवली
ध्येयाची अविरत उर्मी.

आज हा राजबिंडा
चंद्र जागतो आहे
घेऊन आत्मविश्वास हृदयी
जगा पोसतो आहे.

हनुमान कऱ्हाळे

हि लढेल भूमी उदयाला

घेऊन स्वप्न मोठे

दिले दिक्षेत तुम्हीं

अग्निपंख त्या सुरांचे.

१५/१०/२०१६.



# पुन्हा एकदा सर यावी.

पुन्हा एकदा सर यावी
अंगण सारे भिजून जावे
भिजल्या अंगणी सडा
रांगोळीचे रंग वहावे.

पुन्हा एकदा सर यावी
फाटके कुर्ते भिजून जावे
अहिशोबी संसारात
बापाचे घर भरून वहावे.

पुन्हा एकदा सर यावी
रान सारे भिजून जावे
अंकुरल्या बीजापोटी
कित्येकांचे जन्म व्हावे.


पुन्हा एकदा सर यावी
गावाचे तळे भरून जावे
विस्कटलेल्या उन्हाळयात
कोरड्या घश्याचे भय न राहावे.

पुन्हा एकदा सर यावी
अहंकार वाहून जावे
माणसामाणसात प्रेम दाटून
जिव्हाळयाचे इतिहास घडावे.

हनुमान कऱ्हाळे

पुन्हा खूपदा सर यावी
डोळे ओले न होण्यासाठी
माझ्या बापाच्या नम्र पायात
कातड्याचे जोडे राहण्यासाठी.

२७/०६/२०१६.



# तुफानी विचारांनो.

कार्पेट मध्ये गुंडाळलेल्या
गलिच्छ आत्म्यांनो , उठा
तुमच्या सहस्रावधी डोक्याचं
कोड उलगडायचंय.

पहुडलेल्या उनाड रक्तांनो
उफाळून या
पृथ्वीच्या गाभ्यात
डोकावून पाहायचय.

उंबऱ्यात अडकलेल्या

अगणित ध्येयांनो,जागा

अंधाधुंद गर्तेत

का पहुडलात?.

धरणीकंपात मोडलेल्या

निराधार माणसांनो

एकमेकांना हात द्या

कोलमडू नका.

जगास बदलवणाऱ्या

तुफानी विचारांनो,डोळे उघडा

पुन्हा नवा वर्तमान घडवायचाय

नवा इतिहास लिहायचाय.

हनुमान कऱ्हाळे

# अस्तित्व उरले.

निखळला शुक्र तारा
भोवताली धुंद वारा
पक्ष्याच्या घिरटयासंगे
पिंगा घाली पाऊस धारा.

शब्दांचे मोहन भिजले
मातीचे रंग थबकले
दरवळीत सुगंधाळ
फुलांचेही रंग निखळले.

ऋतूत या तू सोबती
स्पर्शाचे युद्ध छेडिले
श्वासाच्या पलीकडे तू
मिठीचे कर्म पाहिले.

धुंद या ओढ्याकाठी
चिंब तू भिजून ओली
ओठांच्या गर्द कळीतून
शब्दांची लकेर उमटली.

सागर थांबला ओहोटीचा
दूर-दूर क्षितिज मोकळे
या धरेवर पाण्यासवे
तुझे नि माझे अस्तित्व उरले.

# स्वतंत्र नाही

स्वातंत्र्यातही होतात

जखमा

अंगाखांद्यावर

दोस्तहो मरणही स्वतंत्र नाही.

मनबुद्धीच्या

विवेकाच्या

होतात शलाका

दोस्तहो जगणेही स्वतंत्र नाही.

भरदिवसा

आतबाहेर

उठतात ज्वाला

दोस्तहो माणुसकीही स्वतंत्र नाही.

गर्जतात

बरसतात

रक्ताचे  ढग

दोस्तहो करुणाही स्वतंत्र नाही.

बाटतात

चाटतात

समाज व्यंग

दोस्तहो चांगुलपणाही स्वतंत्र नाही.

# बंध.

बहरण्यास पुन्हा बेधुंद झालो
तुझ्या गालिचे मंद तेज झालो.

पहिले ना मी कुठे चंद्र आहे
तुझ्या रंध्रातला दवबिंदू झालो.

असेल जगास वेड सुगंधाचे
तुझ्या श्वासातला मी गोड कंद झालो.

भावनेच्या कल्लोळात आले डोळा पाणी
तुझ्या पापणीच्या मी ओला छन्द  झालो.

अमाप पाहिले असतील जगाने फुलोरे

मी तुझ्यातलाच एक गंध झालो.

राहू नये खोट चोट हि जराशी

सात जन्म पुरावा असा बंध झालो.

१०/०२/२०१७.



# कोलारू माडी.

मह्या कोलारू माडीच
मले कवतुक फार
तिच्या उंबऱ्यात हाय
वासे तोलण्याचा भार.

मव्ह कपाळीच कुंकू
जस देव्हाऱ्याचे देव
चले संसाराचं चाक
जस पणतीचा तेव .

## बारुदाची वात

लिप लाविते मनाचं
सारवते घरदार
देवळीच्या राऊळात
मव्ह सख्ख गणगोत.

माथा उजळ वातीचा
रुवा हातानं चेपती
इथं कणकण थोर
कष्टाचं गाणं गाती.

जरी ताडतात डोई
खुजे वासोट्याचे खांब
मनीं नितळतो सखा
नित्य , सत्य खरा राम.

हनुमान कऱ्हाळे

# डाव

आठवले तर आठवून बघ
ते बेधुंद दिवस
सहवासाचे
हास्याचे
मी थरथरत ओठी
हळूच तिला म्हटलं

हसून कल्पित गालात
स्मित मावळून ती म्हणाली
माणसास समाजाचे
नियमांचे
आज्ञांचे
पालन करावे लागते नकळत.

बंधनाचे , श्वासाचे

सूचक सागराचे

असतात ना रे किनारे नेहमी

छळतात  माणसांना

रडवत

हसवत

आपले आपल्याला

आता तिला कुणी सांगावं

ह्या अथांग प्रेमसागरात

प्रेमाच्या बंधनास आणि श्वासास

मी कधीकाळीच त्यागले होते

अंतिम लढाई म्हणूनच

खेळात होतो डाव.

# अण्णाभाऊ साठे.

लढण्याचं दिलं आम्हा भान
असा पराक्रम
दिलात पेरून गेला आग.

गर्जलीं शायरी ज्याची
झाला शायर
गोरगरिबांचा तारणहार.

जन्मली होती हि रीत
घोर गरिबीत
नव्हता बोलण्याचा हि अधिकार.

मनात पेरलं वार
असं घनघोर
झाला क्रांतीचा जयजयकार.

असं तुफान ,पेटलं सार
युद्ध घनघोर
मिळवला जगण्याचा अधिकार.

अशी शायरी माणसा ललकारी
हृदयास कवटाळी
विचारी जाब जगण्याला.

आहे कुणी थोर कुणी आहे नीच

लावली ठेच
पराक्रम अण्णांचा अपरंपार.

दाविली रीत जगण्याचं गीत
नाही कुना भीत
इतिहासा दिला नवा साज.

अशी शायरी लढण्याचं बळ देई
तुडवी पायदळी
भ्रम ब्रम्हाचे ,ललनांचे नाच.

देह पुकारी क्रांतीची तुतारी
वलय नको कुणाचे
नको कुणाची कोरडी हाक.

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.